## कुलगुरू देवानंद शिंदे यांचे प्रत्युत्तर : चर्चेसाठी केव्हाही तयार

# ‘सुटा’चे आरोप बिनबुडाचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रशासन कायदा आणि नियमाने सुरु आहे. यापुढेदेखील त्याच पद्धतीने कामकाज चालणार आहे. मात्र, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघा (सुटा)ने विनाकारण चिखलफेक करून प्रगतिपथावरील विद्यापीठाची आणि कुलगुरू म्हणून माझी विनापुरावा आरोप करून बदनामी केली आहे.


‘सुटा’ने केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. या बदनामीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या संघटनेने छत्रपतींच्या नावाने असलेल्या विद्यापीठाची, माझी बदनामी करणे थांबवावे. जे आरोप केले त्याबद्दल चर्चा करण्यास मी केव्हाही तयार असल्याचे प्रत्युत्तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी येथे दिले.

‘सुटा’ने कुलगुरूंबाबतचे मांडलेले प्रमाद, त्या अनुषंगाने मांडलेल्या मुद्द्यांना उत्तर देत विद्यापीठ विकास आघाडीने ‘सुटा’विरोधात रस्त्यावरची लढाई करण्याचा दिलेला इशारा यामुळे सध्या विद्यापीठ वर्तुळातील वातावरण तापले आहे. त्या पार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी ‘लोकमत’ला विशेष मुलाखत देत ‘सुटा’ने मांडलेल्या प्रमादांबाबत खुलासा केला. त्यांनी हे आरोप धुडकावून लावले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ‘सुटा’ने माझ्यासह विद्यापीठाची विविध अधिकार मंडळे आणि प्रशासनावर केलेल्या सर्व आरोपांचे सर्वप्रथम मी खंडन करतो. विद्यापीठ प्रशासन हे नेहमी चर्चेसाठी तयार असते. विनाकारण प्रश्नांचे आकडे फुगवून फेकण्याचे काम करण्यापेक्षा मुद्देसूद चर्चा करण्यासाठी विद्यापीठ नेहमीच तयार आहे. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यापीठ प्रशासन सदैव त्यांच्यासोबत आहे, याची ग्वाही मी देतो.

### मांडलेले मुद्दे..

- चर्चेसाठी सातत्याने बैठका झाल्या असतानाही त्याविषयी संदिग्धता निर्माण करणारी टिप्पणी ‘सुटा’ने करणे अत्यंत चुकीचे आहे.
- गेल्या साडेतीन वर्षांच्या कालावधीत ८०० हून अधिक शिक्षकांच्या प्लेसमेंटचे काम पूर्ण केले आहे. पदव्युत्तर, पदवीस्तरीय शिक्षकांसाठी संशोधनासह विविध योजना या कालावधीत कार्यान्वित केल्या आहेत.
- कुलगुरू म्हणून मी दिलेल्या महाविद्यालय भेटींना ही संघटना आक्षेप घेते आहे. मूलतः उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षणाचा दर्जा, तेथील सुविधांची पाहणी करणे हे कुलगुरू या नात्याने अतिशय महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने मी, जर महाविद्यालयांना अचानक भेटी देत असेन, तर त्याचे या संघटनांकडून स्वागत व्हायला हवे.
- प्राधिकरणांच्या स्थापनेमध्ये अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे या संघटनेचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात विविध प्राधिकरणांच्या गतिमान पद्धतीने स्थापना करण्यात शिवाजी विद्यापीठ राज्यात आघाडीवर आहे. नव्या विद्यापीठ कायद्यान्वये सल्लागार मंडळाची स्थापना विद्यापीठाने सर्वप्रथम केली. महत्त्वाचे म्हणजे नुकतीच पुण्यात या मंडळाची पहिली बैठक घेण्यात आली.
- अधिकार मंडळांच्या नामनिर्देशनामध्ये महिलांवर अन्याय केल्याचे या संघटनेचे म्हणणे आहे. मात्र, कायद्यान्वये निर्देशित अशा सर्व पदांवर महिला सदस्यांची नियुक्ती विद्यापीठाने प्राधान्याने केली आहे.
- विद्यार्थीहित नजरेआड केल्याचा आक्षेप संघटनेने घेतला आहे. हा तर अत्यंत हास्यास्पद आरोप आहे. विद्यापीठाने विद्यार्थीहित कधीही नजरेआड केलेले नाही. गेल्या तीन वर्षांत विद्यार्थीहिताचे अनेक निर्णय घेतले आहेत.
- विद्यापीठाचे मानांकन घसरले, या संघटनेच्या म्हणण्यातही अजिबात तथ्य नाही. उलट, आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठांचे मानांकन ठरविणाऱ्या ब्रिक्स क्यूएस रँकिंगमध्ये संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठ द्वितीय स्थानी आहे. भारतीय विद्यापीठांत विद्यापीठाचे रँकिंग ५६-६० या दरम्यान आहे. मटेरिअल सायन्सच्या संशोधनात अकृषी विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाचे अग्रस्थान कायम आहे. बायोटेक्नॉलॉजी संशोधन संस्थांत जगातल्या टॉप टेन संस्थांत विद्यापीठाचा समावेश आहे.
- संलग्नित महाविद्यालयांच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास ३८ महाविद्यालयांना ‘नॅक’चे ‘अ’मानांकन आणि १२ महाविद्यालयांना स्वायत्तता प्राप्त झाली आहे. विद्यापीठाच्या ‘वीकर कॉलेज स्कीम’मुळे अनेक महाविद्यालयांमध्ये गुणात्मक सुधारणा मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामध्ये संबंधित शिक्षण संस्था, प्राचार्य, शिक्षक यांचे योगदान मोलाचे आहे.
- देशपांडे आणि तत्सम अहवालांच्या अनुषंगाने जे आक्षेप घेण्यात आले आहेत, तेही गैरलागू आहेत. समित्यांचे कामकाज किंवा चौकशी सुरु असताना कुलगुरु अगर प्रशासनाने त्यांना काही निर्देश देणे म्हणजे त्यांच्या कार्यकक्षेत हस्तक्षेप केल्यासारखे आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या पद्धतीने स्वतंत्रपणे काम करु देण्यास आमचे प्राधान्य आहे, यात चुकीचे काय?
- कुलगुरुंनी विद्यापीठ कायद्यातील कलम १२ (७) चा गैरवापर केला, असा आणखी एक आक्षेप आहे. हा आक्षेप घेण्याचे कारण नाही. एक तर, कुलगुरुंना जिथे अधिकार मंडळांनी हा हक्क वापरण्याचे अधिकार प्रदान केले, त्यावेळी त्यांनी ते वापरले किंवा विद्यापीठाचे व्यापक हित लक्षात घेऊन किंवा एखाद्या आवश्यक बाबीपासून मोठा वर्ग वंचित राहू नये म्हणून आणि म्हणूनच कुलगुरुंनी तो वापरला आहे. त्यामुळे गैरवापराचा प्रश्न उद्‌भवत नाही.
- शैक्षणिक सल्लागार नियुक्ती ही बाब तर जणू काही कुलगुरुंनी अधिकाराचा वापर करुन प्रथमच केली की काय, असे चित्र रंगविले जात आहे. प्रत्यक्षात यापूर्वीही विद्यापीठाने शैक्षणिक सल्लागारांची नियुक्ती केली होती. या विषयावर अधिसभेच्या बैठकीत चर्चा झाली. त्यावेळी ज्या शिक्षक सभासदांनी या संदर्भातील ठराव मांडला होता, त्यांच्यासमोर वस्तुस्थिती विशद केल्यानंतर त्यांनी तो आपण होऊन मागे घेतला होता.
- व्यवस्थापन परिषदेत कुलगुरु सोईने, चुकीचे निर्णय घेतात, असा एक हास्यास्पद आक्षेप आहे. मुळात व्यवस्थापन परिषद असो की अन्य कोणतेही अधिकार मंडळ कुलगुरु हे त्याच्या अध्यक्षस्थानी असतात. मात्र, अधिकार मंडळाच्या बैठकीत होणारे निर्णय हे त्या-त्या संबंधित अधिकार मंडळांनी घेतलेले असतात. कुलगुरुंचा तो वैयक्तिक निर्णय असण्याचे अथवा मानण्याचे कारण नाही.
- ‘सीएचबी’ संदर्भातील शासन निर्णय अमलात आणण्यास दिरंगाई केल्याचा एक आक्षेप आहे. मुळात हा शासन निर्णय विद्यापीठाला अग्रेषित नाही. शासनाने उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाला त्या अनुषंगिक निर्देश दिलेले आहेत. त्यांच्या स्तरावर त्या संदर्भातील कार्यवाही अभिप्रेत आहे. असे असताना विनाकारण त्यात विद्यापीठाला खेचण्याचा हा केविलवाणा प्रयत्नआहे.
- वार्षिक अहवाल निर्मितीत दिरंगाईचा आक्षेप हाही असाच बिनबुडाचा आहे. उलट, वार्षिक अहवाल असो की लेखापरीक्षण अहवाल ते शासनाला विहित मुदतीत पाठविणारे शिवाजी विद्यापीठ हे एकमेव आहे.
- विद्यापीठात जागतिक दर्जाचे अनेक प्राध्यापक आहेत. त्यांच्याविषयी, त्यांच्या कार्यक्षमतेविषयी समाजात गैरसमज पसरविण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून केले जात आहे, हे अत्यंत बेजबाबदारपणाचे आहे.



‘लोकमत’ला विशेष मुलाखत

### मुलाखत देण्यामागील भूमिका

**‘सुटा’कडून माझ्या आणि अधिकार मंडळे यांच्या कारभारावर आक्षेप घेत आरोप केले आहेत. खरे तर, अत्यंत तथ्यहीन, बिनबुडाच्या आरोपांना उत्तरे द्यावीत, इतका त्यात काही दम नाही. मात्र, सर्वसामान्य नागरिक, विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांमध्ये त्यामुळे संभ्रम निर्माण होतो. विद्यापीठ प्रत्येक व्यक्तीपर्यंत व्यक्तिशः पोहोचून हा संभ्रम दूर करु शकत नाही. विद्यापीठाबाबत संबंधित घटकांच्या मनातील भावना ही ‘एनआयआयएफ’, ‘नॅक’ मूल्यांकनासाठी महत्त्वाचा घटक आहे. या मूल्यांकनावर विविध योजनांतर्गत शैक्षणिक, संशोधन कारणांसाठी अर्थसाहाय्य मिळणार आहे. ‘सुटा’ने आरोप करुन संभ्रमाचे वातावरण निर्माण केले आहे. विद्यापीठाने त्याचे खंडन केले नाही, तर विद्यापीठाच्या मानांकनाच्या दृष्टीने जे नुकसान होऊ शकते, ते टाळण्यासाठी या आरोपांना उत्तर देणे आवश्यक आहे. विद्यापीठाचे विविध घटक, हितचिंतकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याच्या हेतूनेच ही मुलाखत देत असल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.**

### ठरावीक जणांचे हे कृत्य

**विद्यापीठाच्या प्रगतीमध्ये प्राचार्य, विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील शिक्षकांचे मोठे योगदान आहे. मात्र, ‘सुटा’कडून विविध आरोपांच्या माध्यमातून विद्यापीठाची बदनामी करण्याचे सुरु असलेले हे कृत्य समग्र शिक्षकांचे नव्हे, तर या संघटनेतील ठरावीक जणांचे असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले. आरोप करणाऱ्या पत्रकातील भाषादेखील व्यक्ती आणि संस्थाद्वेषी वाटते. ही भाषा पाहता खरेच ‘सुटा’ ही शिक्षकांची संघटना आहे का? असा प्रश्न मला पडतो. तथ्यहीन आरोप करून विद्यापीठ आणि माझीच नव्हे, तर समस्त शिक्षकवर्गाची प्रतिमा ही संघटना एकप्रकारे खराब करीत आहे. विद्यापीठ संघर्षातून पुढे आले आहे. ते लक्षात घेऊन ‘सुटा’ने विद्यापीठाची बदनामी करणे थांबवावे.**



### कोणतीही आर्थिक उधळपट्टी केलेली नाही

- **कुलगुरु या पदावरील व्यक्तीने केवळ सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेतच काम करावे, असा काही नियम नाही. त्यामुळे कार्यालयीन वेळेनंतरही काम करता यावे यासाठी निवासस्थानी कार्यालयाची गरज होती.**
- **या कार्यालयाची सुविधा सर्व अधिकार मंडळांच्या रीतसर मान्यता घेऊन निर्माण केली आहे. त्यामुळे आर्थिक स्वरुपातील कोणतीही उधळपट्टी अथवा गैरव्यवहार मी केलेला नाही, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.**
- **ते म्हणाले, गेल्या वर्षीच्या दीक्षान्त समारंभासाठी छपाई केलेल्या पदवी प्रमाणपत्रांच्या मुद्द्यांबाबत चौकशीसाठी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्यांची समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालानंतर रीतसर कार्यवाही केली जाईल.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 6 FEB 2019
तरुण भारत


# आता महाविद्यालयातच पदवी प्रमाणपत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाविद्यालयात पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र त्या ठिकाणीच वितरित करण्याचा परिनियम नवीन विद्यापीठ कायद्यामध्ये आहे. याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेने मान्य केली. विद्यापीठात झालेल्या या व्यवस्थापन परिषदेच्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.



- व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय
- विद्यापरिषदेची शिफारसीला मान्यता



नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ झाल्यानंतर ३० दिवसांमध्ये महाविद्यालयातील पदवीधरांना त्यांची पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र महाविद्यालयातच वितरित करण्याचा परिनियम आहे. या परिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभापासून कार्यवाही करण्याबाबतची विद्या परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्य करण्यात आली आहे. त्याच्या अंमलबजावणीबाबत अहवाल संबंधित समिती पुन्हा व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणार आहे. या परिषदेने अंतिम मान्यता दिल्यानंतर या परिनियमांनुसार कार्यवाही होणार आहे.

सन २०१८-१९ वर्षासाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालंय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत अनुदानप्राप्त होण्यासाठी पारंपारिक महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत छाननी समितीने केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) सदगुरू गाडगे महाराज कॉलेज (कराड), छत्रपती शिवाजी कॉलेज (सातारा) यांना सन २०१९-२९ या कालावधीसाठी दिलेल्या स्वायत्ततेची नोंद देण्यात आली. विद्यार्थी निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जागरूकता, प्रबोधनाचा कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली.

## सुटाकडून आरोपांबाबत पुरावे मागवावे

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यावर केलेल्या आरोपांबाबतचे पुरावे शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाकडून (सुटा) मागविण्यात यावेत, अशी मागणी व्यवस्थापन परिषदेतील विद्यापीठ विकास आघाडीच्या सदस्यांनी या बैठकीत विद्यापीठ प्रशासनाकडे केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 FEB 2019
Times of India

# SUK semester exams from March 26

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will conduct the semester exams for over 600 under-graduate and post-graduate courses in its colleges across Sangli, Satara and Kolhapur districts from March 26.

A circular issued by Mahesh Kakade, director, board of examination and evaluation, SUK, the students will have to fill in the exam forms by February 20 with regular fee. The application window will remain open from February 21 to 26 with late fee.

The last opportunity to fill in the forms with super-late fee will be available from February 27 to March 4 while the date for colleges to submit the list of students for the exams is March 7 with super late fee, stated the circular issued on February 2.

Although the date of exams has been announced in the circular, a detailed schedule for each course will be released soon. Students may check the details on the university website.

The university, according to an official, is aiming to keep the examination duration under 50 days, like it did in the last few semester exams.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 FEB 2019
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या पुण्यात रोजगार मेळावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व पुणे येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड (पुणे) येथे ७ व ८ फेब्रुवारी दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

चिंचवड येथील महामेळाव्यामध्ये १५० हुन अधिक राष्ट्रीय व बहूराष्ट्रीय कंपन्या सहभागी होत असून १०,००० पेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. नुकतेच शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात असणारे विविध विद्याशाखांमधील पदवीधर, डिप्लोमाधारक, आय.टी. आय. धारक हे सर्व नोकरीच्या संधींचा लाभ घेऊ शकतील. या मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांचे संकेतस्थळावर नाव नोंदणी मोफत उपलब्ध आहे.

या मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.



- पुणे चिंचवड येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वेळेत मुलाखती
- १५० हुन अधिक राष्ट्रीय व बहूराष्ट्रीय कंपन्या सहभागी

शिवाजी विद्यापीठातील माजी–विद्यार्थ्यांनी स्नेहमेळाव्यामध्ये पुणे येथे रोजगार महामेळावा आयोजित करण्याची विनंती केली होती. त्या धर्तीवर हा रोजगार महामेळावा होत आहे. सदर मेळाव्यासाठी फ्रेंड्स युनियन फॉर इनरझायझिंग लाइव्हज व लायन्स क्लब ऑफ तळेगांव यांचे सहकार्य लाभले आहे. अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठाचे केंद्रीय रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांच्याशी संपर्क साधावा.

पुढारी

# विद्यापीठातर्फे उद्यापासून पुण्यात महारोजगार मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड (पुणे) येथे गुरुवार, दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महामेळाव्यामध्ये १५० हून अधिक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून, दहा हजारांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. नुकतेच शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात असणारे विविध विद्या शाखांमधील पदवीधर, डिप्लोमाधारक, आय.टी.आय. धारक यांना महामेळाव्यात सहभागी होता येईल.

मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नाव नोंदणी मोफत उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठाचे केंद्रीय रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राम जगताप



## कृष्णा नदीची स्वच्छता...

कराड नगरपालिका, जलसंपदा विभाग, शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि कराडमधील सर्व शैक्षणिक व सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी सकाळी कृष्णा नदी स्वच्छता महाअभियान राबविण्यात आले. शहरवासीयांसह विविध शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी, स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नदी परिसरात स्वच्छता केली.

पुढारी

संक्षिप्त

## विद्यापीठात १६ रोजी राष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विधी अधिविभाग व इंडियन सोशोलॉजिकल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संविधान आणि धर्म : समस्या व दृष्टिकोन' या विषयावर दि. १६ रोजी विद्यापीठातील निलांबरी सभागृहात एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत नवी दिल्लीच्या इंद्रप्रथ विद्यापीठाचे प्रा.डॉ.अफजल वाणी, पंजाबच्या केंद्रीय विद्यालयाचे प्रा.डॉ. तरुण अरोरा, मुंबई विद्यापीठाचे प्रा. रमेश कांबळे विचार मांडणार आहेत. कार्यशाळेत उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, निमंत्रक डॉ. अरुण पौडमल यांनी केले आहे.